# महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण०२२१/प्र.क्र.२४/१३-स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक : १२ मे,२०२२

<u>वाचा</u>:- १. या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे पत्र.
२. या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक ८ मार्च, २०२१ रोजीचे आदेश.
३. या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक २३ मार्च, २०२१ रोजी शुद्धीपत्रक.
४. या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक ३० जुलै, २०२१ रोजीचे आदेश.
५. या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१ रोजीचे शुद्धीपत्रक.
६. महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, क्रमांक : डीएमयु/ २०२०/ प्र.क्र.९२/ डीआयएसएम-१, दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीचे आदेश.

## शासन आदेश

ज्याअर्थी, राज्य शासनाकडे गेल्या काही महिन्यांमध्ये कोव्हीड-१९ पॉझिटीव्ह रुग्णांची नोंद, सातत्याने कमी प्रमाणात होत आहे. तसेच, देशातील व शेजारच्या राज्यांतील कोव्हीड-१९ रुग्णसंख्येच्या आलेखामध्ये, निरंतर व सातत्याने घट होत आहे. आवश्यक निर्बंधांचे विविध आस्थापनांकडून कोव्हीड-१९ विषयक निर्बंधाचे पालन करण्यात येत असलेल्या शिस्तीमुळे तसेच, बहुसंख्य जनतेने कोव्हीड अनुरूप वर्तन विषयक शिस्त बाळगण्यामुळे हे सर्व यश प्राप्त झाले आहे. राज्यातील व देशातील लसीकरण मोहिमेला देखील मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले आहे आणि त्यामुळे सार्वजनिक तसेच खाजगी आरोग्य विषयक पायाभूत सुविधांवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास हातभार लागला आहे. त्यामुळे, राज्य शासन सर्व सहकारी संस्था त्यांच्या सभासदांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचा विचार करीत असून, वाचा क्रमांक १ ते ५ येथील सर्व आदेश या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

ज्याअर्थी, आवश्यक निर्बंधांचे शिस्तीने पालन केल्यामुळे तसेच,राज्यातील व देशातील लसीकरण मोहिमेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यामुळे, कोव्हीड-१९ पॉझिटीव्ह रुग्णांची नोंद, सातत्याने कमी होत आहे. त्याचप्रमाणे, देशातील, राज्यातील कोव्हीड-१९ रुग्णसंख्येच्या आलेखामध्ये, निरंतर व सातत्याने घट होत आहे.

Scanned by TapScanner

त्याअर्थी, वाचा क्रमांक ६ येथील महसूल व वन विभाग,(मदत व पुनर्वसन) यांचे आदेश विचारात घेवून राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे घेण्याबाबत नव्याने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

०१. राज्यात कोरोना विषाणुमुळे उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे सार्वजनिक आरोग्य विभाग व महसूल व वन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना / आदेशांचे काटेकोरपणे पालन करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदी विचारात घेवून राज्यातील सर्व सहकारी संस्थांनी त्यांच्या सभासदांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा व अधिमंडळाची विशेष बैठक घेण्याबाबतची कार्यवाही करावी.

०२. सहकारी संस्थांनी वार्षिक सर्वसाधारण सभा / अधिमंडळाची विशेष बैठक घेण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग व महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

०३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०५१२१४३९०३२१०२ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(श्रीकृष्ण वाडेकर)**
**विशेष कार्य अधिकारी व सह निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. आयुक्त साखर, साखर संकुल, पुणे.
३. आयुक्त दुग्ध, पुणे.
४. संचालक वस्त्रोद्योग, नागपूर.
५. विभागीय सहनिबंधक / जिल्हा उपनिबंधक/ उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
६. निवडनस्ती.



Scanned by TapScanner